# सर्व साधारण सुचना

## महाराष्ट्र शासन- महिला व बाल विकास विभाग,
## एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे आस्थापनेवरील
## मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) संवर्ग गट - क सरळ सेवा भरती.
## जाहिरात-2024

1. महिला व बाल विकास विभाग एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत मुख्यसेविका गट-क संवर्गातील सरळसेवा कोटयातील एकुण 102 रिक्त पदांच्या भरती करीता फक्त पात्र महिला उमेदवाराकडून विभागाच्या www.httpt//icds.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने दि.14.10.2024 रोजी 11.00 वाजले पासून ते दि. 03.11.2024 रात्री 23.55 वा.पर्यंत या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर ( Computer Based Test) ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.
2. प्रस्तुत परीक्षेमधून महाराष्ट्र राज्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) प्रकल्पांतर्गत सरळसेवेच्या कोटयातील गट-क संवर्गातील मुख्यसेविका यांची 102 पदे भरण्यांत येणार आहेत.
3. **परीक्षा दिनांक** :- याबाबतची माहिती www.httpt//icds.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उमेदवारांच्या ऑनलाईन प्रवेशपत्रकाव्दारे कळविण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता करणा-या उमेदवाराकडून शासनाच्या ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

**4. पदसंख्या व आरक्षणा संदर्भात सर्वसाधारन तरतुद :-**

4.1 **पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सुचने नुसार बदल (कमी / वाढ) होण्याची शक्यता आहे.**

4.2 पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा / सुचना वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा /सुचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधुन भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.परीक्षा स्थगिती करणे, रदद करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व प्रवर्ग निहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती तथा मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई व समन्वय समिती यांचे कडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

4.3 प्रस्तुत जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करे पर्यत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रामध्ये मागास प्रवर्ग तसेच संमातर आरक्षणाची पदे उपलब्ध होण्याची तसेच विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे.

4.4.महिला व बाल विकास विभाग अधिसुचना दि.04/06/2021 नुसार मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदाचे सेवा प्रवेश नियम निश्चित करण्यात आलेले आहेत.त्यामधील तरतुदीनुसार मुख्यसेविका गट-क या संवर्गाची 100% पदे फक्त महिला उमेदवार या मधूनच भरली जातील. महिलासाठी आरक्षित पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारानी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन,महिला व बाल विभाग,शासन निर्णय क्र.महिआ-2023/प्र.क्र.123/कार्या-2/दि.4/05/2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरती निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलाकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

4.5 **विमुक्त जाती (अ) , भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार, गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.**

4.6 एखादी जाती / जमाती राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषीत केली असल्यास तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र Caste Certificate उमेदवाराकडे अर्ज करतानांच उपलब्ध असणे बंधनकारक असून त्या नंतरच संबधित जाती / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

4.7. संमातर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्हि.-2012/प्र.क्र.-16/12/16-अ/दि.13/08/2014 तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-1118/प्र.क्र.39/16-अ/दि.19/12/2018 आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

4.8 आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील (ईडब्लूएस)उमेदवारा करीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.राआधी-4019/प्रक्र.31/ 16-अ/ दि.12/02/2019 व दि.31/05/2021 व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-2024/प्रक्र. 75/ 16-क / दिनांक 27 फेब्रूवारी 2024 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र कागदपत्र अर्ज करते वेळी सादर करणे आवश्यक राहील. तथापी विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर न केल्यास सदर उमेदवारास खुल्या प्रवर्गातील नियम लागू राहतील .

4.9 सामाजिक आणि मागास वर्ग सरळसेवेने भरण्यात येणारी 10 % पदे सन 2024 च्या महाराष्ट्र शासन अधिनियम क्रमांक 16 दिनांक 26.02.2024 चा महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागास वर्गा करिता आरक्षण अधिनियम 2024 तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी2024/प्रक्र-75/ 16-क दिनांक 27.02.2024 मधील निर्देशा नुसार सामजिक व शैक्षणिक मागास वर्गाची (एस.ई.बी.सी.) रिक्त पदे भरण्यात येतील .तसेच शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीसी 2024/पक्र.75/ आरक्षण दिनांक 28.6.2024 मधील निर्देशानुसार विहित करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील .तसेच या संदर्भात शासना कडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागास वर्गा करिता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारां करिता लागू राहतील .तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी2024/प्रक्र-75/ 16-क दिनांक 27.02.2024 मधील निर्देशा नुसार प्रलंबीत असलेल्या न्यायालयीन याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून नियुक्त्या देण्यात येतील .

4.10 शासन परीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सीबीसी-2012/प्र.क्र.182/विजा भज-1, दि.25/03/2013 अन्वये विहित कार्यपध्दीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबधित जाहिरातीमध्ये नमुद अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांकास संबधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटामध्ये मोडत नसल्या बाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

4.11 शासन परीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सीबीसी-2013/प्र.क्र.182/विजा भज-1, दि.17/08/2013 अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

4.12 सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणुन मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवाराचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबावत शासन धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

4.13 अराखीव (खुला) उमेदवाराकडून विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटीची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित /उपलब्ध नसले तरी ,अर्जा मध्ये त्यांचा मुळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

4.14 कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसामान्य रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसामान्य रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा 1950 च्या कलम 20 नुसार जो अर्थ आहे तोच लागू राहील.

4.15 कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर)अथवा सोयी सवलतीचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबधित कायदा /नियम/ आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांका पुर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

4.16 सामाजिक व समांतर आरक्षण संदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

4.17 **खेळाडू आरक्षण :-**

4.17.1 शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-2002/ प्र.क्र.68/क्रीयुसे-2/दिनांक 1जुलै2016 तसेच शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-2002 / प्र.क्र.68 /क्रीयुसे-2/ दिनांक 18/08/2016शुध्दीपत्रक दि.10 आक्टोबर 2017, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक संकीर्ण-1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2 दिनांक 30/06/2022 आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

4.17.2 प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षाणाचा दावा करणा-या उमेदवाराच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परिक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकाचे तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

4.17.3 खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करिता पात्र ठरतो या विषयाच्या पडताळणी करीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबधित विभागीय उपसंचालक क्रिडा विभाग कार्यालयाकडे परिक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू साठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

4.17.4 एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता उपसंचालक क्रिडा विभाग यांचे कार्यालयाकडे सादर करणे बंधणकारक आहे.

4.17.5 परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करित असल्या बाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्या बाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूंसाठी आरक्षित पदांवरील निवडी करिता पात्र ठरतो , या विषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्यपत्र पडताळणी बाबतचा अर्ज सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्ती करिता विचार करण्यात येईल .

4.18. **दिव्यांग आरक्षण** :

4.18.1: दिव्याग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.दिव्यांग-2018/पत्रक्र-114/16-अ/दिनांक 29 मे 2019 , महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग-2019/प्र.क्र.79/ का-7/ मंत्रालय मुंबई दि. 5 जुलै 2021 , दिव्यांग कल्याण विभाग ,शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2022/प्रक्र.79/दि.क.2 मंत्रालय मुंबई दि. 10.11.2023 तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल .

4.18.2: महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग , एकात्मिक बाल विकास सेवा योजना च्या विभागांतर्गतच्या विविध संवर्गा करिता दिव्यांगाची पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत . सदरचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट तीन प्रमाणे आहे.

4.18.3.: दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्ये पैकी असतील .

4.18.4. दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग/पदां करिता पात्रता शासना कडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार राहील .

4.18.5. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांका नुसार त्यांची शिफारस करण्यात येईल .

4.18.6. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान 40% दिव्यांगाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/ व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोई/सवलतीसाठी पात्र असतील .

4.18.7. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील .

अ ) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमाण 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोई-सवलती .

ब) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमाण 40% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधी दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोई सवलती .

4.18.8. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेउ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रकि-2018/प्रक्र-46/ आरोग्य-6/ दिनांक 14 सप्टेंबर 2018 मधील आदेशा नुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकिय प्रणाली व्दारे वितरित करण्यात आलेले नविन नमून्यातील दिव्यांगत्वाचे नविन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

4.19 : **अनाथ आरक्षण** :

4.19.1. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-2022/ पत्र क्रमांक-122/कार्या-03/ दिनांक 6 एप्रिल 2023 व सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दिनांक 10 मे 2023 तसेच या संदर्भात शासना कडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार राहील.

4.19.2.महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागा कडील शासन निर्णय क्र. अनाथ-2018/पत्र क्र-182/ कपार्या-3/ दिनांक 6 सप्टेंबर 2022 तसेच दिनांक 6 एप्रिल 2023 अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करते वेळी महिला व बाल विकास विभागा कडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणेकडून वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही .

4.19.3.अनाथ आरक्षणाचा लाभ घेउन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला मा.आयुक्त, महिला व बाल विकास विभाग पुणे यांचे कडून अनाथ प्रमाणपत्र यांची पडताळणी करून नियुक्ती देण्यात येईल .

4.19.4.अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्ते नुसार निवड झालेले उमेदवारांचा सामावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्याच प्रवर्गातून करण्यात येईल .

**4.20 : माजी सैनिक आरक्षण:**

4.20.1.गुणवत्ता यादी मध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नांव नोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकारी यांचे कडून पडताळणी झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही .महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-1082/3502/सीआर-100/16-अ/ दिनांक 2.9.1983 नुसार -

अ- माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर भरती करतांना युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक 15% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील .

ब- युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने 15% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्तीस पात्र राहील . तथापि उमेदवाराने संबंधित पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

4.20.2.माजी सैनिकां करिता आरक्षणा संदर्भातील तरतूदी शासना कडून वेळो वेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार असतील.

**4.21. प्रकल्पग्रस्तां साठीचे आरक्षण :**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम-1080/35/16-अ/ दिनांक 21 जानेवारी 1980 तसेच या संदर्भात शासना कडून वेळो वेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील .गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील प्रकल्पग्रस्त असले बाबतचे शासकिय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील .लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या ज्या अधिकारी यांचे कडून पडताळणी करून घेतले जाईल .सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल .

**4.22. भुकंपग्रस्तां साठीचे आरक्षण :**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.भुकंप 1009/35/16-अ/ दिनांक 27 ऑगष्ट 2009 तसेच या संदर्भात शासना कडून वेळो वेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील .गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भुकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील भुकंपग्रस्त असले बाबतचे शासकिय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील .लेखी परीक्षेत निवड झालेल्या भुकंपग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या ज्या अधिकारी यांचे कडून पडताळणी करून घेतले जाईल .सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**4.23. पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांचे करिता आरक्षण :**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.पअंक-2009/ पत्र क्र.200/2009/ कार्या-16-अ दिनांक 27 ऑक्टोबर 2009 व क्र. अंशंका-1913/ प्रक-57/ 2013/16-अ/ दिनांक 19 सप्टेंबर 2013 नुसार शासकिय कार्यालयामध्ये 3 वर्षा पर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केली असणे आवश्यक राहील.निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. सदरचे प्रकरणी सेवायोजन कार्यालयाकडून पडताळणी करून त्यांचे कडून प्राप्त झालेला अहवाला नुसार करण्यात येईल .

5. **<u>पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शर्ती (सर्व उमेदवारांसाठी)</u>**

5.1.उपरोक्त मुख्यसेविका या पदांसाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्यांचे कडे महाराष्ट्र राज्याचे आधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

5.2. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही .

5.3. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र (Cast

Certificate) व जातवैधता प्रमाणपत्र (Validity Certifacate) निवड अंती सादर करणे आवश्यक आहे.

5.4. जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-2011/प्रक्र.1064/ 2011/16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 मधील तरतूदी नुसार तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केलेच्या दिनांका पासून 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रदद करण्यात येईल .

5.5 उमेदवारांना परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल .परिक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपुर्वी 1 तास 30 मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.

5.6 नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक 21.10.2005 नुसार लागू करण्यात आलेली नविन परिभाषीक अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील .त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही .तथापि सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्या प्रमाणे योजना लागू राहील.

5.7. एका संवर्गासाठी संपुर्ण राज्यात एकाच दिवशी एकाच वेळेस परिक्षा घेणेचे आयोजित आहे.

5.8 अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणी करते वेळी तपासण्यात येतील .सदर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांना बंधनकारक राहील . त्या मधील प्रमाणपत्रे खोटी , चुकीची व अपुर्ण आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल .

**6. पात्रता :**

6.1. भारतीय नागरीकत्व तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे .

6.2. **वयोमर्यादा :** - उमेदवाराचे वयाची गणना ही ऑनलाईन अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास गणण्यात येईल .

6.2.1. **वयोमर्यादा गणण्याचा दि.** 03.11.2024 **अर्ज स्विकारण्याचा अंतीम दि :** 03.11..2024. 23.55 **वा. पर्यंत.**

6.2.2. **मुख्यसेविका संवर्गासाठी किमान व कमाल वयो मर्यादा बाबत तपशिल खालील प्रमाणे -**

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | खुल्या प्रवर्गासाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2015/पत्र क्र404/कार्या-12/दिनांक 25 एप्रिल 2016 मधील तरतूदी नुसार किमान 21 वर्षापेक्षा कमी नसावे व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे . |
| 2 | मागासवर्गिय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2015/पत्र क्र404/कार्या-12/दिनांक 25 एप्रिल 2016 मधील तरतूदी नुसार किमान 21 वर्षापेक्षा कमी व 43 वर्षापेक्षा जास्त नसावे . तथापी उन्नत व प्रगत गटामध्ये क्रिमिलेअर गटामध्ये , वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, वि.मा.प्र., इ.मा.व. उमेदवारांना ही सवलत लागू राहणार नाही . |
| 3 | पदवीधारक अंशकालीन उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक अशंका -1918/ प्रक्र.-507/16-अ/ 2 जानेवारी 2019 मधील तरतूदी नुसार कमाल वयोमर्यादा 55 वर्षे राहील. |
| 4 | स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य , सन 1991 ची जनगणणा कर्मचारी व सन 1994 नंतर निवडणूक कर्मचारी यांचे साठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक निवक 1010/ प्रक्र.-08/2010/16-अ 6.10.2010 मध्ये दिलेल्या निर्देशा नुसार कमाल वयोर्यादा 45 इतकी राहील . या घटकातील मागासवर्गीय कर्मचारी यांना देखील उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे 45 इतकी राहील . |
| 5 | खेळाडू उमेदवारांसाठी | शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग कडील शासन निर्णय क्रमांक राक्रिधो - 2002/प्रक्र.68/क्रियुसे-2/ दिनांक 1.7.2016 मधील तरतूदी नुसार खेळाडूंची गुण्वत्तता व पात्रता विचारात घेउन सदर पदासाठी असलेल्या विहित वयो मर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल .तथापी उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे 43 इतकी राहील . |
| 6 | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-1098/पत्र क्र39/9816-अ/ दिनांक 16 जून 2001 मधील तरतूदी नुसार उच्चतम वयोमर्यादा सरसकट 45 वर्ष इतकी राहील . |
| 7 | प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक प्रकल्प -1006/ मुस-396/पत्र क्र.56 /06/16-अ/ दिनांक 3 फेब्रुवारी 2007 मधील तरतूदी नुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील . सदर वयो मर्यादा सरसकट शिथील केली असल्याने , मागासवर्गिय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारां नाही कमाल वयोमर्यादे बाबत 45 वर्षे पर्यंतची सवलत राहील . |
| 8 | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक मासैक-1010/ पत्र क्र.279/10/16-अ/ दिनांक 20.08.2010 मधील तरतूदी नुसार माजी सैनिक उमेदवारांसाठी विहित |

| | | |
|---|---|---|
| | | वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील तसेच दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील . |
| 9 | अनाथ उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्रमांक अनाथ-2022/ प्रक्र.122/ का-03/ दिनांक 6 एप्रिल 2023 अन्वये अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनुसुचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले परिक्षा शुल्क , किमान गुणवत्ता पात्रता आणि वयोमर्यादा इत्यादी निकष लागू राहतील . |

**7. शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

7.1. जाहीराती मध्ये नमूद पदांसाठी अर्ज करणे कामी जाहीरात प्रसिध्दी दिनांक 14.10.2024 रोजी उमेदवाराने पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पुर्णत: धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदांचे नांव | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| 1 | मुख्यसेविका / पर्यवेक्षिका | संविधानिक विद्यापीठाची पदवी धारण करणारी कोणत्याही शाखेची पदवीधर उमेदवार | एस-13- रू.35400 -112400 |

1) परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यांत येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास 02 गुण ठेवण्यांत आलेले आहेत.
2) शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. प्रनिर्म-2009/प्र.क्र.356/ई-10, दि. 01/02/2010 मधील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र. प्रनिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ, दि. 04 मे, 2022 मधील तरतुदीनुसार या पदांकरिता मौखिक परिक्षा (मुलाखती) घेण्यांत येणार नाहीत.
5) उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16 अ, दि. 16/03/1999 आणि शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण 1119/प्र.क्र.3916-अ, दि. 19/12/2018 तसेच शासन निर्णय क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13-अ, दि.4 मे, 2022 अन्वये कार्यवाही करण्यांत येईल.
6) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ, दि.4 मे, 2022 मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
7) परीक्षेचा निकाल (निवडसुची) तयार करतांना परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं1222/प्र.क्र.54/का.13-अ दि. 4 मे 2022 मध्ये आधारे क्रमवार लावला जाईल.
8) परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यांत येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यांत येणार आहे. सत्र 1 व अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्यता तपासण्यांत येऊन त्याचे समानीकरण (Normalization) करणेचे बाबत TCS कंपनीकडून देण्यांत आलेले सूत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित केले आहे. सदर (Normalization) सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील. याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

**8) विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे संलग्न (Upload):-**

1) प्रोफाईलव्दारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने परीक्षेकरिता अर्ज सादर करतांना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे PDF फाईल फॉरमॅट मध्ये संलग्न (Upload) करावीत.
2) उमेदवारांची ऑनलाईन (Computer Based Test) लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल
3 ) विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करतांना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली ) संलग्न (Upload) करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | प्रमाणपत्र /कागदपत्र | अ.क्र | प्रमाणपत्र /कागदपत्र |
|---|---|---|---|
| 1 | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | 10 | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| 2 | वयाचा पुरावा | 11 | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| 3 | शैक्षणिक अर्हता इत्यादिचा पुरावा | 12 | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | सामाजिक दृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | 13 | खेळाडू आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा |
| 5 | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा | 14 | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| 6 | प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | 15 | भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्रअसल्याचा पुरावा |
| 7 | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | 16 | एस. एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा |
| 8 | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.ब,खेळाडू, दिव्यांग,माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र पुरावा | 17 | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| 9 | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | 18 | संगणक ज्ञान पुरावा |

4) खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाच्या दाव्यांचा अनुषंगाने प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रे / कागदपत्रे संलग्न (Upload) केल्याशिवाय ऑनलरईन अर्ज स्विकृत केल्या जाणार नाही.

## 9. सर्वसाधारण सूचना :-

1) अर्ज फक्त ऑनलाइन प्रणालीव्दारेच स्विकारण्यांत येतील.

2) उमेदवारास मुख्यसेविका या पदासाठी फक्त एकच अर्ज सादर करता येईल.

3) अर्ज सादर करण्याकरिता संकेतस्थळ www.httpt//icds.gov.in राहील.

4) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.httpt//icds.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

5) अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

6) अर्ज भरण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारिख संगणका मार्फत निश्चित केली असल्याने पेमेंट गेटवे दिलेल्या तारखेला व वेळेला बंद होणार आहे. त्यामुळे परिक्षार्थी उमेदवारांनी मुदतीतच अर्ज व परिक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

### 9.1 परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सुचना :-

9.1.1 अर्ज सादर करताना परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

9.1.2 परीक्षा केंद्र बदला बाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

9.1.3 परीक्षा केंद्र निवडीची प्रक्रिया पुर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासी पत्त्याचे आधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्र देण्यात येईल, या बावत शासनाचे त्या-त्या वेळेचे धोरण व निर्णय अंतिम राहील.

### 9.2 परीक्षा शुल्काचा भरणा :-

9.2.1 परीक्षा शुल्क (फी )

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| 1 | खुला प्रवर्गासाठी | रू.1000 (एक हजार रूपये मात्र) |
| 2 | मागासवर्गीय प्रवर्गासाठी | रू. 900 (नउशे रूपये मात्र) |

9.2.2 माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

9.2.3 परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

9.2.4 परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने खालील पध्दतीने करता येईल .

1) परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या पेमेंट गेटवेच्या माध्यमातुन UPI, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

2) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यातुन परीक्षा शुल्काची रक्कमेची वजावट झाल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश - ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्षित झाल्या शिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेत स्थळावरील संबंधित पृष्ठावरुन आणि/ अथवा खात्यातून लॉग आऊट होउ नये.

3) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापुर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पुर्ण झाला असल्या बाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

4) परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक / विहीत वेळेपुर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास या संदभातील तक्रांरीची दखल घेतली जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकणाऱ्या उमेदवारांचा संबंधीत भरती प्रक्रिये करिता विचार केला जाणार नाही. किंवा सदर प्रश्नी कोणत्याही पत्रव्यवहारास उत्तर दिले जाणार नाही .

9.2.5 **अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी** :-

| अ.क्र | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि.14.10.2024 11.00 **वा.** ते दि.03.11.2024 **रात्री** 11.55**वा.पर्यंत** |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचा व विहित परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.14.10.2024 11.00 **वा.** ते दि.03.11.2024 **रात्री** 11.55**वा.पर्यंत** |
| 3 | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक , कालावधी व इतर सुचना | www.httpt//icds.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत येईल. |

**१०. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत :-**

१०.१. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परिक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.दिव्यांग२०१९/प्र.क्र २००/दि.कर,दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय ( Benchmark ) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका -२०२१ तसेच तदनंतर शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लिहण्यासाठी सक्षम नसलेल्या व सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणी प्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक व इतर सोई उपलब्ध करून देण्यात येतील . तथापी लक्षणिय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवरांनी लेखनिक / वाचक सहाय्यक पुरविणे आवश्यक असल्यास ज्या पदासाठी उमेदवार पात्रता परिक्षा देत आहे त्याच्या एक टप्याने कमी लेखनिक / वाचक सहाय्यक याची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक राहील ,तसेच मुख्य वैद्यकिय अधिकारी , जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकिय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले Appendex-I प्रमाणपत्र सादर केल्या नंतर दिव्यांग परिक्षार्थीस लेखनिक / वाचक अथवा सहाय्यक नियुक्त करण्यास परवानगी देण्यात येईल .

१०.२. प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदतीची आवश्यकता असल्यास संबेधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना त्याबाबत नमुद करणे गरजेचे आहे. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. संलग्न (Upload) करावयाच्या कागदपत्रांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या "दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सुचना" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय , दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/ दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ मधील तरतूदी नुसार राहतील .

१०.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारास स्वत: स्वखर्चाने करावी लागणार.

१०.४ परिक्षे करीता लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेव्दारने "दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सुचना" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय , दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/ दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ नुसार APPENDIX-I, APPENDIX-II च्या विहित नमून्यात प्रमाणपत्रांची पुर्तता संबंधित उमदवाराने सादर करणे बंधनकारक आहे . उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्यास, लेखनिकाची शैक्षणिक अहर्ता ज्या पदासाठी परिक्षा दिली जाणार आहे त्या शैक्षणिक अहर्ता पेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

१०.५ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आवश्यक कागदपत्रे संलग्न (Upload) न केलेस ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

१०.६ परिक्षेकरीता लेखनिकाची मदतीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

१०.७ प्रत्यक्ष परिक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत घेण्यास इच्छुक असलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारां करिता मार्गदर्शक सुचनांचे अवलोकन करणे उमेदवारांस आवश्यक आहे. त्याच प्रमाणे परिक्षेकरीता लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेव्दारने "दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सुचना" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शासन निर्णय , दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/ दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ नुसार APPENDIX-I, APPENDIX-II सादर करणे बंधणकारक आहे . मदतनिसाने दिव्यांग उमेदवरासकेवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराचे उत्तर लिहण्यास मदत करणे अपेक्षित आहे. मदतनिसाने प्रश्न वाचून दाखविल्या नंतर उमेदवाराने सांगीतलेले उत्तरच विहित ठिकाणी चिन्हांकित (Marking) करणे अपेक्षित आहे. ऑनलाईन परिक्षा दरम्यानलेखनिक स्वतंत्रपने प्रशनांची उत्तरे देत असल्याचे निदर्शणास आल्याससदर उमेदवाराचे सत्र समाप्त केले जाईल आणि उमदवारी रद्द केली जाईल ,उमेदवाराने सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनांचे पालन न केल्यास अथवा चुकीची माहिती दिल्यास / दिशाभूल केल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती कोणत्याही टप्प्यात रद्द होण्यास पात्र राहील .

**11. निवडसुचिची कालमर्यादा :-**

11.1. निवड समितीने तयार केलेली निवडसुची 1 वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करताना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांका पर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. तद्नंतर ही निवडसुची व्यपगत होईल. भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया , निवडसूची, प्रतिज्ञासूची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथा स्थितीत लागु राहतील.

11.2 निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधुन ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रूजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/ अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळुन आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यु झाल्याने पद रिक्त झल्यास,अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारामधुन निवडसुचीच्या कालर्मयादेत वरिष्ठते नुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसुची , प्रतिक्षासुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सूचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

**12. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास :-** परिक्षेचा निकाल तयार करताना, परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल .

12.1 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

12.2 समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र.(अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

12.3 वरील अनु.क्र.(अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता ( पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर,उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालात परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा.

12.4 वरील अनु.क्र.(अ) (ब) (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवाऱ्यांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतरम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात यावा.

(टीप : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय-1205/प्र.क्र.189/म-7, दिनांक 23 जानेवारी, 2006 अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याच्या पाल्य (पत्नी/मुलगा/मुलगी) होय)

**13. सेवा प्रवेशोत्तर शर्ती :-**

13.1 मुख्यसेविका या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस सेवा नियमानुसार आवश्यक अर्हता सेवाप्रवेशात्तर परिक्षा विहित वेळेत व विहित संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. किंवा प्रचलित नियमानुसार सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून सूट मिळणे आवश्यक राहील .

13.2 जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय परिक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

13.3 मुख्यसेविका या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार सदर दोन्ही भाषा परिक्षा उत्तीर्ण केली असणे अथवा या दोन्ही भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्या पासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील किंवा सदर दोन्ही भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा विहित मुदतीनंतर परिक्षा उत्तीर्ण होई पर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही .

13.4 महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे अथवा सदर प्रमाणपत्र धारण करण्या पासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील .किंवा संगणक प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास या बाबत नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील . अन्यथा विहित मुदतीनंतर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही . तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही .

13.5. मुख्यसेविका या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कूटूंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम 2005 मधील तरतूदी नुसार व त्या बाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमानुसार नियुक्तीच्या वेळी लहान कूटूंबाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक राहील . अन्यथा सदर व्यक्ती शासकिय सेवेसाठी अपात्र ठरेल .

13.6 मुख्यसेविका या पदावर नियुक्त होणाऱ्या महाराष्ट्र राज्यात कोठेही नियुक्ती अथवा बदलीस पात्र राहतील .

13.7 मुख्यसेविका म्हणून निवड झालेल्या उमेदवारास पायाभूत व उजळणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणे आवश्यक राहील .

13.8 उमेदवाराची मुख्यसेविका या पदावर नियुक्ती झाल्यास शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेश संबंधित उमेदवारास बंधनकारक राहतील.

**14. प्रवेश प्रमाणपत्र :-**

14.1 परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर उमेदवाराच्या प्रोफाईल व्दारे परिक्षेपूर्वी सर्वसाधारनपणे 10 दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यांत येईल.त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

14.2 परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

14.3 प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यांत आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या अर्जात नमूद नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल.याबाबतची घोषणा www.httpt//icds.gov.in संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक आठवडा अगोदर प्रसिध्द करण्यांत येईल.

14.4 परीक्षेच्या दिनांकापूर्वी तीन दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह निवड समितीच्या www.httpt//icds.gov.in या ई-मेल वर संपर्क साधावा.

14.5 परीक्षेच्या वेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र ,पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

14.6 आधारकार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळखपत्र प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवारांचे नांव, पत्ता,लिंग,फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhar Generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यास तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यास ई-आधार वैध मानण्यांत येईल.

14.7 नावामध्ये बदल केलेल्या असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रिया यांच्या बाबतीत ) नावात बदल झाल्यासंबंधीत अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झालेल्या संबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

15. **परीक्षेस प्रवेश** :- संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यांत येईल. तथापि परिक्षा सुरु होण्यापूर्वी नेमून दिलेल्या केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी 1 तास 30 मिनिटे अगोदर ओळखपत्र तपासणीची पूर्तता करण्यासाठी उपस्थित रहावे लागेल.

15.1 कोणत्याही परिस्थितीमध्ये अन्य ओळखपत्राच्या आधारे तसेच परीक्षा सुरु झाल्यानंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही अशा उमेदवारांना पुर्नपरीक्षा देण्याची कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.

15.2 शासनाचे www.httpt//icds.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली माहिती/जाहिरात व देण्यात आलेल्या सूचना अधिकृत समजण्यांत येईल. करिता वेळो वेळी उमेदवाराने संकेत स्थळावरील सुचनांचे अवलोकन करण्यात यावे .परिक्षा संबंधी कांही संदेश द्यावयाचा असल्यास त्या बाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद उमदवारांनी घेण्यात यावी

15.3 सदर जाहिरात शासनाच्या www.httpt//icds.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**16. विशेष महत्वाच्या सूचना :-**

16.1. कार्यालयांत परिक्षा कक्षात परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणतेही प्रकारची इलेक्ट्रानिक्स साधने आणण्यांस व वापरण्यांस सक्त मनाई आहे.

16.2 प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रते संदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यांत येणार नाही.

16.3 परीक्षे करिता येणाऱ्या परीक्षार्थीस प्रवासभत्ता वा इतर कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही . उमेदवाराने स्वत:च्या खर्चाने दिलेल्या परिक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे .

16.4 अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराचे वय 21 वर्षे पूर्ण झालेले नसल्यास निवड प्रक्रिये करीता अपात्र समजण्यात येईल.

16.5 उमेदवारास गैरवर्तणूकीच्या कारणास्तव नगरपरिषद किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकार किंवा कोणतेही शासन यांनी सेवेतून बडतर्फ केले असल्यास निवड प्रक्रिये करीता अपात्र समजण्यात येईल.

16.6 शासनाच्या कोणत्याही विभागाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते उमेदवार नैतिक अध:पतन या गुन्ह्याखाली दोषी आढळून आल्यास निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर सदर उमेदवारास अपात्र समजण्यात येईल.

16.7 महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा संघ लोकसेवा आयोगाकडून कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधित केलेल्या उमेदवारांना प्रतिरोधनाच्या कालावधीमध्ये कोणत्याही निवड प्रक्रियेकरीता अपात्र समजण्यात येईल.

16.8 अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी गणण्यात येईल.

16.9 मुख्यसेविका या पदावर निवड झाल्यानंतर एक महिन्याच्या आत वैद्यकिय पात्रता प्रमाणपत्र (Certifiate Of Medical

Fitness) पोलिस तपासणी अहवाल (Police Verification Certificate) सादर करणे बंधणकारक राहील.

16.10 अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराचे वय किमान 21 वर्षे पूर्ण झालेले नसल्यास निवड प्रक्रियेकरीता अपात्र समजण्यात येईल.

16.11 उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतुदी शासन अथवा संचालनालयाद्वारे कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता असते. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील असे बदल, प्रसिद्धी पत्रक इत्यादी सर्वसाधारणपणे आयुक्तालयाच्या www.https:icds.gov.in संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

16.12 शासनाने त्याच प्रमाणे मा.अध्यक्ष, राज्य स्तरीय निवड समिती यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील .परीक्षेच्या अनुषंगाने आवश्यक ती अद्ययावत माहिती / सद्यस्थिती करीता उमेदवाराने वेळोवेळी या आयुक्तालयाच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

*****************************************************************************************

परिशिष्ट -1

**महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास विभाग शासन पत्र क्र. मबाआ-2019/ प्रक.-113/ का-7 दिनांक 10 ऑगष्ट 2023 नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय यांचे अधिनस्त मुख्यसेविका या पदांसाठी परिक्षा नियमावली नुसार सर्व पात्र उमेव्दारांची लेखी परिक्षा एकाच वेळी घेण्यात येईल.या करिता एकूण 200 गुणांचे वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective) पेपर असेल व प्रत्येक प्रश्नास दोन गूण असतील सर्वसाधारण परिक्षा स्वरूप खालील प्रमाणे**

| पेपर | विषय | पात्रता | भाषा | प्रश्न संख्या | गुण | वेळ | परिक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण विषय | इंग्रजी | पदवी | इंग्रजी | 10 | 20 | 1.30 दीड तास (दिव्यांग उमेव्दारा करीता **2.00 दोन तास.)** | **वस्तूनिष्ठ व बहू पर्यायी प्रश्न** |
| | मराठी | पदवी | मराठी | 10 | 20 | | |
| | सामान्य ज्ञान | पदवी | मराठी | 20 | 40 | | |
| | एकात्मिक बाल विकास सेवा योजना व कायदे | पदवी | मराठी | 20 | 40 | | |
| | पोषण अभियान | पदवी | मराठी | 10 | 20 | | |
| | गणित, बुध्दीमत्ता चाचणी व अंकगणित | पदवी | मराठी | 20 | 40 | | |
| | संगणक ज्ञान | पदवी | मराठी | 10 | 20 | | |
| | **एकूण** | | | **100** | **200** | | |

परिशिष्ट -2

**भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणबाबतचा तपशील खालीलप्रमाणे - 100 % महिलांसाठी**

| अ.क्र. | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै. मा. प्रवर्ग | आ.दु. घ. | अ राखीव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची पदे | 13 | 6 | 3 | 2 | 3 | 1 | 2 | 19 | 13 | 13 | 27 | 102 |
| 1 | सर्वसाधारण | 8 | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 11 | 8 | 8 | 17 | 65 |
| 2 | खेळाडू | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| 3 | माजीसैनिक | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 4 | 15 |
| 4 | अंशकालीन पदवीधर | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 10 |
| 5 | भुकंपग्रस्त | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 2 |
| 6 | प्रकल्पग्रस्त | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| 7 | दिव्यांग (4%) | 1) LV, 2) OA, LC, 3) AAV, 4) MD = 4 पदे समांतर क्रमानुसार आरक्षणातून भरण्यात येतील . | | | | | | | | | | | |
| 8 | अनाथ (1%) | 1 पद नियमानुसार आरक्षणातून भरण्यात येतील | | | | | | | | | | | |

परिशिष्ट -3

मुख्यसेविका गट-क या संवर्गातील दिव्यांग प्रवर्गा करिता एकूण 4 पदे आरक्षित असून सदर पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने खालील नमूद प्रकार , शारिरिक पात्रता व पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेउन अर्ज करणे आवश्यक राहील.

| संवर्ग | भरावयाची पदे | दिव्यांगाचा प्रकार | शारिरिक पात्रता | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| मुख्यसेविका | 04 | 1) LV<br>2) OA, LC<br>3) AAV<br>4) MD | S<br>ST<br>W<br>L<br>MF<br>RW<br>H<br>C<br>SE | 1.अंगणवाडी सेविकांच्या कामाचे पर्यवेक्षिकां कडून पर्यवेक्षण करणे . नागरी भागातील 25 अंगणवाड्यांसाठी एक मुख्यसेविका /पर्यवेक्षि का असेल तसेच तिच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे असतील.<br>अ-पर्यवेक्षिका संबंधित अंगणवाडी सेविकांसह अंगणवाड्यांचा कार्यक्रम आखतील;<br>ब- अंगणवाडी सेविकांना क्षेत्रीय समस्या निवारण करणे,<br>क-कुटुंबांची यादी तयार करणे, लोकसंख्येचे लक्ष्य गट ओळखणे यासाठी मदत आणि मार्गदर्शन करेल.<br>ड-सर्व जन्म आणि मृत्यूच्या नोंदी अद्ययावत ठेवणे .<br>2.त्यानंतर ती कुपोषित आणि आजारी बालकांची ओळख पटवणे, मुलांचे योग्य वजन करणे आणि वजनकार्डवर त्यांचे वजन योग्यरित्या लिहिणे, साधी औषधे व प्रथमोपचार देणे, गंभीर कुपोषित व आजारी बालकांना PHC मध्ये पाठवणे, आणि आरोग्य केंद्रात अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे नियंत्रण व त्यांना मार्गदर्शन करणे .<br>3.पूरक पोषण आहार कार्यक्रम तीन महिन्यातून एकदा बीट स्तरावर नियमित क्षेत्रीय भेटीद्वारे अंगणवाडी केंद्रांच्या कामकाजावर देखरेख आणि मार्गदर्शन करेल आणि अशा प्रकारे महिन्यातून सुमारे 20 दिवस दौरा करेल.<br>4.ICDS योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि क्षेत्रीय समस्या आणि त्यांचे निराकरण यावर चर्चा करण्यासाठी ती नियमितपणे तिच्या नियंत्रणाखाली आणि देखरेखीखाली असलेल्या अंगणवाडी सेविकांशी महिन्यातून किमान एकदा, प्रकल्प मुख्यालयात किंवा तिच्या स्वतःच्या क्षेत्रीय मुख्यालयात किंवा अंगणवाडी केंद्रांवर नियमितपणे बैठका आयोजित करेल:<br>5. अंगणवाडी सेविकांना कौटुंबिक संपर्क वाढवणे, गृहभेटी घेणे, वाडांतील /गावातील सभा घेणे इ.<br>6. वेळोवेळी अंगणवाडीतील सर्व नोंदी, रजिस्टर्स, रोख आणि खाती, साठा आणि साहित्य तपासेल आणि अंगणवाडी सेविकांना या संदर्भात आवश्यक सूचना आणि सूचना देईल आणि अंगणवाडी सेविकांकडून मासिक प्रगती अहवाल नियमितपणे सादर करण्याची खात्री करेल:<br>7. साधे आणि शिक्षित आरोग्य आणि पोषण शिक्षण संदेश तयार करेल, प्रचार सामग्रीचा वापर करेल आणि आरोग्य आणि पोषण शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी अंगणवाडी सेविकांना मदत आणि मार्गदर्शन प्रदान करेल:<br>8. त्याचप्रमाणे, ती अंगणवाडी सेविकांना कार्यात्मक साक्षरता वर्ग आयोजित करण्यात मदत करेल आणि मार्गदर्शन करेल त्यांच्या भेटींमध्ये वर्गांना गुंतवून, योग्य शैक्षणिक साहित्य प्रदान करून आणि कार्यात्मक साक्षरता घटक समृद्ध करण्यासाठी इतर कार्यकर्त्यांची मदत आणि समर्थन मिळवून देईल<br>9. ती एकीकडे अंगणवाडी सेविका आणि CDPO तसेच अंगणवाडी सेविका आणि PHC कर्मचारी, विशेषतः L.HVs यांच्यात संपर्क व समन्वय करणे .<br>10. ती अंगणवाडी सेविकांना स्थानिक स्तरावरील समित्यांची निर्मिती आणि कामकाजात मदत करेल आणि मार्गदर्शन करेल आणि महिला मंडळे एकत्रित करेल आणि प्राथमिक शाळांशी जवळचे संबंध प्रस्थापित करेल; आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत शासनाच्या बाले व महिला यांचेशी निगडीत सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्यक म्हणून कार्य करेल.<br>**या संदर्भात अधिक माहितीसाठी महिला व बाल विकास विभाग शासन नि.क्र.एबावि-2009/प्रक्र.135/का-5/मंत्रालय मुंबई 5 जानेवारी 2010 चा शासन निर्णय पहा.** |

A- 1) LV- Low Vision , 2) OA, LC - One arm , Leprosy Cured , 3) AAV - Acid Attack Victim , 4) MD - Multiple Disablity

B- 1) S - Sitting , 2) ST - Standing 3) W - Walking 4) L - Lifting 5) MF - Manupulation by Fingers 6) RW - Reading and Writing 7) H - Hearing 8) C - Communication 9) SE- Seeing .

(कैलास पगारे, भा.प्र.से.)
अध्यक्ष, राज्य स्तरीय निवड समिती
तथा
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई